

सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 21/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 273 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# 4500 मतदार गायब

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकिसाठी प्रभाग निहाय मतदार यादीचे प्रारुप निवडणूक विभागाने जाहीर केले मात्र, त्यात प्रचंड मोठ-मोठे घोळ समोर येत आहेत. भोसरी परिसरातील बालाजीनगर प्रभाग क्रमांक ८ मधील सुमारे ४ हजार ५०० मतदारांची नावे यादीतून गायब असल्याचे उघडकिस आले. स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सिमा सावळे यांच्या निकटवर्ती मतदारांचीच नावे यादितून वगळण्यात आली आहेत, असे तपासणीत स्पष्टपणे निदर्शनास आले.**



महापालिकेच्या ३२ प्रभागांच्या मतदार याद्यांचे प्रारुप काल दुपारी जाहीर करण्यात आले. प्रभाग रचनेनुसार याद्या फोडण्यात आल्या. बालाजीनगर प्रभाग क्रमांक ८ मधील यादी क्रमांक ३८८, ३८९, आणि ३९० मधील सुमारे ४५०० मतदारांची नावेच गायब आहेत. प्रभाग निहाय याद्या फोडतानाच कोणीतरी हा खोडसाळपणा केल्याचा दाट संशय सिमाताई सावळे यांनी व्यक्त केला. मतदार वगळल्याचे सखोल तपासणीत आढळले, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकऱणी आपण निवडणूक विभागाकडे तक्रार कऱणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.अशाच प्रकारे बहुसंख्य प्रभागांच्या मतदारयादीत घोळ आहेत. राजकीय सुडापोटी काही नावे, चाळी, सोसायट्या वगळून दुसऱ्याच यादीत समाविष्ठ केल्याच्या तक्रारी आहेत. अनेक ठिकाणी मतदारांची नावे वगळून भलत्याच प्रभागाच्या यादीत घुसडल्याचेही सांगण्यात आले.

निवडणूक विभागाने सर्व प्रभागांच्या यादीत मतदारसंख्या जवळपास सारखी असेल आणि कमी अधिक फरक हा १० टक्केच्या पुढे नसावा असे सांगितले होते. प्रत्यक्षात सर्वात मोठा प्रभाग क्रमांक १ चिखली गावठाण हा ७४ हजार ३४० मतदारांचा आहे, तर थेरगावगावठाण प्रभाग २३ मध्ये फक्त ३४ हजार ७६५ मतदार आहेत. दुपटीपेक्षा मोठा अधिक मतदारसंख्येचे प्रमाण कमी जास्त असल्याने असमतो वाढला आहे. तब्बल सहा प्रभाग हे ६४ हजारापेक्षा जास्त मतदारांचे तर पाच प्रभाग हे ४० हजाराच्या आतील मतदारांचे आहेत.

# नवले पूल दुर्घटनेनंतर उद्योगमंत्र्यांची पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**धायरी: नवले पुल परिसरात अलीकडे झालेल्या भीषण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (ता. २०) घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. वारंवार होणाऱ्या अपघातांवर तात्पुरते आणि कायमस्वरूपी उपाय तातडीने अंमलात आणण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.**



**कायमस्वरूपी उपाय तातडीने अंमलात आणण्याचे स्पष्ट निर्देश**

नवले पुलाचा उतार, या मार्गावरील वेगवान वाहतूक आणि रस्त्याची रचना या प्रमुख कारणांमुळे अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. या गंभीर समस्येवर त्वरित तोडगा काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मंत्री सामंत यांनी उपस्थित नागरिकांशीही संवाद साधला आणि त्यांच्या सूचनांची नोंद घेतली. केवळ तात्पुरत्या नव्हे, तर दीर्घकालीन उपायांवर देखील चर्चा करण्यात आली, जेणेकरून भविष्यात अशा दुर्घटना पूर्णपणे थांबतील.दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील लवकरच नवले पुलाची पाहणी करणार असून, त्यानंतर ते उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत.

या बैठकीमध्ये अपघात रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजनांवर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. या पाहणी दौऱ्यावेळी माजी आमदार रवींद्र धंगेकर, नमेश बाबर, रमेश कोंडे, सोमनाथ कुटे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# महिलांच्या रोजगाराबाबत शासन पूर्णपणे अपयशी

## दुर्गा ब्रिगेडचा आरोप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महिलांच्या रोजगाराबाबत शासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करत दुर्गा ब्रिगेड संघटनेने आक्रमक पाऊल उचलले असून शहरातील हजारो महिलांच्या हाताला काम नसल्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.**




नेहरूनगर महानगरपालिका क-प्रभाग कार्यालय येथे झालेल्या आढावा बैठकीत महिलांच्या रोजगार, लघुउद्योग, स्वच्छता व मूलभूत सुविधांवर सविस्तर चर्चा झाली. क-क्षेत्रीय प्रशासन अधिकारी सुनीता वाइकर ,तसेच समाज विकास विभागातील मा. जावजी पोटे व मा. सुप्रिया करंजकर यांना निवेदन देण्यात आले.बैठकीत सांगण्यात आले की महानगरपालिका महिला विकास विभाग शहरातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात अयशस्वी ठरत आहे. विविध योजना, सूचना संस्था पातळीपर्यंत जातात; मात्र त्या महिलांपर्यंत पोहोचत नाहीत, ही गंभीर बाब दुर्गा ब्रिगेडने प्रशासनासमोर मांडली. रोजगार, मार्गदर्शन, प्रशिक्षण व लघुउद्योगांसाठी जागा–भांडवल–विक्रीव्यवस्था देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याची तातडीची मागणी करण्यात आली.बालाजी नगर परिसरातील स्वच्छतेच्या समस्यांबाबतही आरोग्य विभागाला त्वरित कारवाईचे निर्देश देण्यात आले.पुढील काळात महिलांना प्रत्यक्ष रोजगार मिळावा यासाठी दुर्गा ब्रिगेड संघटना आणि फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन संयुक्तरित्या योजना राबवणार आहेत. उद्योगांची कामे देण्यासाठी आम्ही तयार आहोत महानगरपालिकेने प्रशासनिक सहकार्य करावे असे इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी सांगितले.

महानगरपालिकेने चार दिवसांत ठोस निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दुर्गा ब्रिगेडच्या अध्यक्षा कु. दुर्गा भोर यांनी दिला. बैठकीस संस्थापक अध्यक्षा दुर्गा भोर, अभय भोर, राहिसा पठाण, रेश्मा मुल्ला, सविता शेंडगे आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# अनुया कवडे यांना राष्ट्रीय भारत भूषण आदर्श शिक्षिका पुरस्कार.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल अनुया कवडे यांना साई ज्योती फाउंडेशन तर्फे यावर्षीचा" राष्ट्रीय भारत भूषण आदर्श शिक्षिका" 2025 हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**



भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे येथे हा दिमाखदार सोहळा पार पडला.शालेय शिक्षक, शैक्षणिक सल्लागार, ट्रेनर अशा विविध पदांवर गेल्या 20 वर्षांपासून अनुया या शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

विशेष मुलांसाठी अनुया यांचे खास योगदान आहे .बीजेस या सेवाभावी संस्थे तर्फे शालेय गुणवत्ता सुधारणा प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र आणि छत्तीसगढ येथे प्रकल्प प्रमुख या पदावर काम केले आहे.


पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील शाळा, कॉलेजेस मध्ये पेस अंतर्गत विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे प्रशिक्षण देण्याचे योगदान आहे.हा पुरस्कार मिळाल्याने अनुया यांचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

यावेळी आयोजक सचिन हळदे, साई ज्योती फाउंडेशन चे उपाध्यक्ष,विकास उबाळे, साई इंडियन ट्रस्ट असोसिएशन दिल्लीचे अध्यक्ष डॉ.शंकर आदानी अभिनेत्री मृणाली कुलकर्णी ,फिल्म अभिनेता युवराज कुमार ,अभिनेत्री केतकी गावडे ,यांच्या प्रमुख उपस्थित देण्यात आला.पदाधिकारी आणि समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# येत्या रविवारी होणार 1 हजार 400 परीक्षा केंद्रावर टीईटी परीक्षा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा येत्या रविवार २३ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील ३७ जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी १ हजार ४२३ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा परिषदेमार्फत उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती परिषदेच्या अध्यक्षांनी कळविली आहे.**




परीक्षेच्या पेपर १ साठी २ लाख ३ हजार ३३४ तर पेपर २ साठी २ लाख ७२ हजार ३३५ असे एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ परीक्षार्थी प्रविष्ट होणार आहेत. परीक्षार्थींना ओळख पटवूनच प्रवेश देण्यात येईल. परीक्षा दालनामध्ये मोबाईल, स्मार्ट वॉच, कॅलक्युलेटर इत्यादी इलेक्ट्रॉनिक साहित्य घेऊन जाता येणार नाही.सर्व परीक्षा दालनामध्ये, परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर व केंद्र संचालकांच्या कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

परीक्षेसंदर्भात समाजमाध्यम व प्रसारमाध्यमांद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्या, अफवांवर विश्वास न ठेवता परीक्षा परिषदेच्या https://www.mscepune.in व http://mahatet.in या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे, असेही कळविण्यात आले आहे.

# तीन पिस्तूल, तीन काडतुसे आणि दोन तलवारी जप्त!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : निगडी, बावधन आणि चिंचवड येथे केलेल्या तीन वेगवेगळ्या कारवयांमध्ये पोलिसांनी तीन पिस्तूल, तीन काडतुसे आणि दोन तलवारी जप्त केल्या आहेत. याबाबत बुधवारी गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. तीन कारवायांमध्ये तिघांना अटक केली आहे.**




शस्त्र बाळगल्या प्रकरणी पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेने एका तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई आकुर्डी येथे करण्यात आलेल्या कारवाईत राज अशोक कांबळे (२१, आकुर्डी) याला अटक केली आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई संदेश देशमुख यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राज याच्याकडून एक पिस्तूल दोन तलवार असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. निगडी पोलीस तपास करत आहेत.बावधन पोलिसांनी जाधव वस्ती येथे कारवाई करत आकाश नामदेव पवार (२२, बावधन) याला अटक केली.

त्याच्याकडून एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. ही कारवाई बुधवारी सायंकाळी करण्यात आली. बावधन पोलीस तपास करत आहेत. चिंचवड पोलिसांनी वाल्हेकरवाडी येथे हुसेन उर्फ पंजा रमजान बागवान (२९, ताथवडे) याला अटक केली.

त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काढतुसे जप्त केली. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

# टेम्पोच्या धडकेत सात वर्षीय चिमुकल्याचा जागीच मृत्यू!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्यात हिट अँड रनची भयंकर घटना घडली. आजोबा आणि छोट्या भावासोबत जात असलेल्या एका सात वर्षाच्या मुलाचा टेम्पोच्या धडकेत मृत्यू झाला. बुधवारी रात्री ही घटना घडली. अनुराग चांदमारे असे मृत्यू झालेल्या मुलाचं नाव आहे. या घटनेत आजोबा आणि पाच वर्षाचा मुलगा जखमी झाला आहे.**

अनुराग हा त्याचे आजोबा बंडू वावळकर आणि भाऊ अभिनव चांदमारे यांच्यासोबत जात होता. त्याचवेळी टेम्पोने तिघांना उडवले. यात सात वर्षाच्या अनुरागचा जागेवरच मृत्यू झाला. तर पाच वर्षाचा अभिनव आणि आजोबा बंडू वावळकर हे जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.धडक देऊन फरार झालेल्या टेम्पो चालकाचा बावधन पोलीस सध्या शोध घेत आहेत. बुधवारी रात्री उशिरा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला.दोन दिवसापूर्वीच एका २० वर्षीय तरुणीला डम्परने चिरडल्याची घटना घडली घडली होती. हिंजवडी आयटी पार्कमध्ये तन्वी सिद्धेश्वर साखरे (वय २०) ही तरुणी वडिलांसोबत दुचाकीवरुन जात होती. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या डम्परने दुचाकीला जोरात धडक दिली.



# सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीवर नागरिकांना हरकती व सूचना दाखल करण्यासाठी २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५ हा कालावधी देण्यात आला आहे.**




नागरिकांकडून येणाऱ्या हरकती व सूचना स्वीकारण्यासाठी अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच सावित्रीबाई फुले सभागृह येथे मुख्यालय स्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी दिली.राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १ ते ३२ करीता तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्यांबाबत काही हरकती व सूचना दाखल करावयाच्या असतील, तर अशा मतदारांनी नमुना 'अ' मध्ये आणि तक्रारदारांनी नमुना 'ब' मध्ये दिलेल्या मुदतीमध्ये त्या दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांचा विचार केला जाणार नाही, अशी माहिती महापालिका निवडणूक विभागातून देण्यात आली.सदर प्रारूप मतदार याद्या प्रभागनिहाय माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रति पृष्ठ रु.२/- याप्रमाणे सावित्रीबाई फुले सभागृह येथे विक्रीस उपलब्ध आहेत, अशी माहिती देखील निवडणूक विभागातून देण्यात आली.

**राज्य निवडणूक आयोगाचा मतदार यादी कार्यक्रम -**

प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिद्ध करणे : २० नोव्हेंबर २०२५

प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करणे : २० नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५प्रारूप मतदार यादीवर दाखल हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे : ५ डिसेंबर २०२५मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे : ८ डिसेंबर २०२५मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे : १२ डिसेंबर २०२५

"प्रारूप मतदार यादी ही आगामी निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. शहरातील प्रत्येक मतदाराने स्वतःचे नाव योग्यरित्या नोंदले आहे का, याची खात्री करून आवश्यक असल्यास हरकती व सूचना वेळेत दाखल करणे अत्यावश्यक आहे. प्रारूप मतदार यादीवर येणाऱ्या हरकती व सूचनांवर निवडणूक आयोगाच्या नियमान्वये कार्यवाही करण्यात येईल."

**-विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# मतदार यादीच्या शुल्क धोरणात सुधारणा करण्याची
## आम आदमी पार्टीची मागणी'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष श्री. रविराज बबन काळे यांनी राज्य निवडणूक आयुक्तांना निवेदन देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादीच्या शुल्क धोरणात तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे.**




काळे यांनी दाखवून दिले की, सध्या आकारले जाणारे शुल्क अनावश्यकरीत्या वाढीव असून सर्वसामान्य उमेदवार आणि नागरिकांसाठी आर्थिक अडथळे निर्माण करणारी आहे.मुख्य आक्षेप शुल्क धोरणातील तफावत व नागरिकांवरील वाढता आर्थिक बोजा प्रती पान ₹ 2 शुल्क; एका वार्डाची मतदार यादी घेताना एकूण खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो.उमेदवारी अर्जासाठी सुमारे ₹10,000 खर्च, त्यात अतिरिक्त मतदार यादीचे शुल्क सामान्य व्यक्तीसाठी परवडणारे नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेची संपूर्ण यादी घेतल्यास खर्च तब्बल ₹2.5 लाखांपर्यंत. ऑनलाइन उपलब्ध यादीमध्ये मतदारांचे फोटो नसल्यामुळे पडताळणी अपूर्ण व त्रुटीपूर्ण ठरते.फोटोसह यादी सुलभ उपलब्ध नसणे पुनरावृत्ती, चुकीची नावे किंवा शंकास्पद नोंदी शोधणे कठीण होत आहे. काळे यांनी स्पष्ट केले की, मतदार यादी हे सार्वजनिक कागदपत्र असून त्याची उपलब्धता सहज, कमी दरात आणि सर्वसमावेशक असणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. अवाजवी शुल्क पारदर्शकतेची गळचेपी करते आणि सामान्य नागरिकांचा सहभाग कमी करते.

**'आप'ची राज्य निवडणूक आयोगाकडे स्पष्ट मागणी**

मतदार यादीच्या शुल्क धोरणात तातडीने पुनर्विचार करावा

शुल्क तर्कसंगत, सुलभ आणि सर्वांना परवडणारे करावे

फोटोसहित मतदार यादी सर्व उमेदवारांना उपलब्ध करून पारदर्शकता वाढवावी

शुल्क धोरण जनसहभाग वाढवणारे आणि सर्वसमावेशक असावे.

रविराज काळे यांनी आयोगाला पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, निवडणुकीत पारदर्शकता आणि जनतेचा सहभाग वाढवण्यासाठी शुल्क धोरणातील बदल अत्यावश्यक आहेत.

हे परिवर्तन म्हणजे लोकशाही बळकट करण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल असेल अशी तक्रार ईमेलद्वारे केली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734